# काकासाहेबनगरला ३,४६५ ग्रामस्थांची आरोग्य तपासणी

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षणसंस्था, के. के. वाघ फाउंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन, स्माईल व स्पिनॅच यांच्या संयुक्त विद्यमाने बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १४ वे आरोग्य तपासणी महाशिबिर काकासाहेबनगर (ता. निफाड) येथील के. के. वाघ शैक्षणिक संकुल येथे पार पडले. यावेळी ३,४६५ ग्रामस्थांनी आरोग्य तपासणी केली.

शिबिरात नेत्रचिकित्सा, अस्थिरोग तपासणी, बीपी, शुगर तपासणी, जनरल फिजिशियन, कान-नाक-घसा तपासणी, कर्करोग तपासणी, अस्थिघनता तपासणी, हृदयविकार तपासणी, दंतविकार तपासणी, मेंदुविकार तपासणी, फिजिओथेरपी, पोट व यकृत विकार तपासणी, फुफ्फुस, मूळव्याध व हर्निया तपासणी, मूत्रविकार तपासणी, स्त्रीविकार तपासणी, बालरोग तपासणी ४२, ईसीजी, एंडोस्कोपी आदी नागरिकांनी विविध तपासण्या केल्या. तसेच ९२१ पैकी २६१ रुग्णांना मोतीबिंदू निष्पन्न झाला आहे. या शिबिराप्रसंगी डॉ. प्राची पवार (नेत्र तपासणीतज्ज्ञ), डॉ. अतुल पाटील (हृदयरोगतज्ज्ञ), इंदोरवाला हॉस्पिटलतर्फे कान-नाक-घसातज्ज्ञ, डॉ. स्वनील साखला( फुफ्फुस-छातीविकार तज्ज्ञ), डॉ. संदीप पानगव्हाणे (अस्थिविकारतज्ज्ञ), डॉ विकास कदम (मूत्रसंस्था विकारतज्ज्ञ), डॉ. पूजा कदम (स्त्रीविकारतज्ज्ञ), डॉ. निनाद थोरात (मेंदूविकारतज्ज्ञ), डॉ. अमित बोरसे (दंतविकारतज्ज्ञ), डॉ. गौरव कुलकर्णी (पोट व यकृत विकारतज्ज्ञ), डॉ. रोहन देव (फिजिओथेरपिस्ट), डॉ. श्वेता मुर्तडक (जनरल फिजिशियन) या नामांकित या डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. या शिबिराचा रानवड, पालखेड, कुंभारी, दावचवाडी, लोणवाडी, आहेरगाव, शिरवाडे वणी, गोरठाण, खडकजांब, रेडगाव, नांदूर खुर्द, वावी, सावरगाव, सारोळे खुर्द, नांदुर्डी, देवपूर, पंचकेश्वर, ब्राह्मणगाव, खडकमाळेगाव, खाणगाव, देवरगाव, पिंपळद, हिरापूर या गावांतील ग्रामस्थांनी लाभ घेतला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त शकुंतला वाघ, निवेदिता वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, प्राचार्य पी. टी. कडवे, समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर, डॉ. बी. व्ही. कर्डिले, प्रतिष्ठीत नागरिक इंद्रभान रायते, कैलास भोसले, दत्तू डुकरे, रामभाऊ पाटील, रामनाथ पानगव्हाणे, बाबाजी कुशारे, अशोक निफाडे, रमेश शिंदे, पंडित आहेर व गावांतील सरपंच तसेच संस्थेतील प्राचार्य, प्राध्यापक शिक्षककेतर कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै.गावकरी ,दि.५ मार्च २०२६